CS (MAIN) Exam : 2017

STH-D-MRTH

मराठी / MARATHI

प्रश्न-पत्र II / Paper II

साहित्य / Literature

वेळ : *तीन* तास *Time Allowed : **Three** Hours*	कमाल अंक : **250** *Maximum Marks : **250***

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात :

*आठ प्रश्नांची विभागणी **दोन भागांमध्ये** केलेली आहे.*

*उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.*

*प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

***मराठीतच** उत्तरे लिहावीत.*

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतेली एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

Question Paper Specific Instructions

Please read each of the following instructions carefully before attempting questions :

*There are **EIGHT** questions divided in **TWO SECTIONS.***

*Candidate has to attempt **FIVE** questions in all.*

*Questions no. **1** and **5** are compulsory and out of the remaining, any **THREE** are to be attempted choosing at least **ONE** question from each section.*

The number of marks carried by a question / part is indicated against it.

*Answers must be written in **MARATHI**.*

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

SECTION A

Q1. पुढील *पाच* उताऱ्यांचे 150 शब्दांत संदर्भासह सटीक विवेचन करा. *10×5=50*

(a) "स्त्रियांची जात फार अबला असल्यामुळे लोभी व धाडसी पुरुषांनी मोठी कावेबाजी करून कोणत्याही कामामध्ये स्त्रीजातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर सर्व पुरुषांनी आपलेच घोडे पुढें दामटले. त्यांस मानवी हक्क समजू देऊ नये, या इराद्याने त्यांस विद्या शिकविण्यास प्रतिबंध केला. यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचा जुलमी प्रसंग येऊन गुदरला." *10*

(b) " 'रत्नमाळा'चि पोथी वाचूनि केशोबासिं भटोबासाते पुसिले : हा भटो यैसेचि 'उद्धरण' बांधो : तंव भटोबासिं म्हणितले : नको गा केशवदेया : येणे माझिया म्हांतारीया नागवतिल : मग केशोबास संस्कृतबंधु न करीतीचि :" *10*

(c) "स्त्री ने अविवाहित असतां मातृत्त्व पत्करले तें वस्तुत: पाप नाहीं. तें पाप समजले जातें याचें कारण त्याचा परिणाम इष्ट होत नाही, हें होय. स्त्री लग्नाशिवाय पुरुषापाशीं राहिली तर त्या स्त्रीला पुरुषाच्या इस्टेटीवर अधिकार उत्पन्न होत नाही; व त्या स्त्रीपासून उत्पन्न होणाऱ्या प्रजेस बापाच्या इस्टेटीवर हक्क उत्पन्न होत नाही; म्हणून विवाहाशिवाय प्रजोत्पत्ति निषेधिली गेली आहे." *10*

(d) "रंगी हतबुद्ध झाली. तिला हुंदका आवरला नाही. ती काहीशा कळवळयानं पुन्हा त्या मुलाला विनवू लागली. पण सारं व्यर्थ. तो जागचा हलायला तयारच होईना. तिला एकाएकी बा ची आठवण झाली. आपण त्याला एकटं सोडून आल्याचं तिला जाणवले. त्याच काही बरंवाईट तरी नाही ना झालं ?" *10*

(e) "सगळ्या मर्यादा धडाधड झुगारून द्यायच्या हेच तेवढं मॉडर्न. चार लोकात छाप पाडण्यासारखं ज्ञान दाखवणं हे स्मार्ट. जाड्या जाड्या पुस्तकात डोकं खूपसून बसून 'डोंट बॉदर मी नाऊ' असं म्हणणे म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जोपासना. टाईपरायटरवर चार पानं खरडून कुठं छापून आणणं ही विद्वत्ता. मुकाट पोटासाठी उद्योग करणारी, कुणाच्या अध्यात मध्यात न पडणारी, इंटरनॅशनल पॉलिटिक्सचं स्पेलिंगसुद्धा करता न येणारी माणसं तुमच्या लेखी निर्बुद्ध ओंडके. असू देत मग. मी त्यांच्यातलीच आहे." *10*

Optional Province · optionalprovince.com

Q2. (a) 'स्मृतिस्थळ म्हणजे महानुभावांचा आचारधर्म आणि तत्त्वज्ञान यांचा वाङ्मयीन आकृतिबंध होय' या विधानाचा परामर्श घ्या. *15*

(b) भारतीय जातिव्यवस्थेच्या संदर्भात एक वेगळी समाजशास्त्रीय जाण व्यक्त करणारी कादंबरी म्हणून केतकरांच्या 'ब्राम्हणकन्या' या कादंबरीचे स्वरूप उलगडून दाखवा. *15*

(c) 'शेतकऱ्यांच्या अवनतस्थितीची अनेक कारणे प्रामुख्याने धर्म आणि राज्य या संस्थेशी निगडित आहेत' हा महात्मा फुले यांचा विचार 'शेतकऱ्यांचा असूड' मधून कसा व्यक्त झालेला आहे, ते स्पष्ट करा. *20*

Q3. (a) 'शिळान'च्या आधारे उद्धव शेळके यांच्या लेखनशैलीचे विशेष स्पष्ट करा. *15*

(b) ऱ्हासशील मराठी रंगभूमीला सावरून धरणारे लोकप्रिय विनोदी नाटक म्हणून अत्रे यांच्या 'साष्टांग नमस्कार' या नाटकाचे समीक्षण करा. *15*

(c) 'दलित जीवनातील वेदनेबरोबरच विद्रोहाचा प्रखर स्वर हे बाबुराव बागुल यांच्या कथांचे मुख्य वैशिष्ट्य आहे' हे 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. *20*

Q4. (a) 'गौरी देशपांडे यांच्या लघुकादंबऱ्या स्त्री-पुरुष संबंधाचे व्यक्तिवादी दृष्टीतून चित्रण करणाऱ्या आहेत' 'एकेक पान गळावया'च्या आधारे स्पष्ट करा. *15*

(b) एका दलिताच्या असहाय, दु:खी जीवनाचे चित्रण करणारी आत्मकथा म्हणून 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथेची वैशिष्ट्ये सांगा. *15*

(c) समकालीन मराठी कादंबरीपेक्षा शरत्चंद्र मुक्तिबोध यांच्या 'जन हे वोळतु जेथें' या कादंबरीचे वेगळेपण काय, ते सांगा. *20*

Optional Province · optionalprovince.com

SECTION B

Q5. पुढील *पाच* उताऱ्यांचे 150 शब्दांत रसग्रहणात्मक सटीक विवेचन करा. *10×5=50*

(a) अंबरगत परी पयोधराते रगडुनि पळतो दुरी
काय हा धीट म्हणावा तरी
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया हरी
नव्हे गे मारूत मेघोदरी ।। *10*

(b) ती शीतलोपचारी जागी झाली हळूच मग बोले
'औषध नलगे मजला'; परिसुनि जननी बरे म्हणोनि डोले. *10*

(c) खुळा दधिची फसला देऊन
अपुली हाडे असुरवधास्तव,
त्या वज्राने तेव्हापासून
मानव आहे कापित मानव *10*

(d) ज्यांना जन्मभर दु:ख, दैन्य, दारिद्र्यच मिळाले असेल
त्यांनी तपशीलासह सर्वच नाकारू नये, तर काय करावे ?
आश्वासित शब्दांवर आता माझाही विश्वास उरलेला नाही
प्रत्येक संदर्भातून दुर्गंधीच येत आहे; तर काय करावे ? *10*

(e) भक्त विठोबाचे भोळे । त्यांचे पायी ज्ञान लोळे
भक्ति विण शब्दज्ञान । व्यर्थ अवघे ते जाण
नाही ज्याचे चित्ती भक्ति । जळो तयाची व्युत्पत्ति
नामा म्हणे ऐसे जाण । नाही भक्तिसी बंधन *10*

Q6. (a) भक्ति आणि लोकोपदेश या आशयावरील संत नामदेवांच्या अभंगांचा 'नामदेवांची अभंगवाणी'च्या आधारे परामर्श घ्या. *15*

(b) पंडिती काव्यातील एक सर्वोत्तम रचना म्हणून 'दमयंति-स्वयंवर' या काव्याचे सौंदर्य उलगडून दाखवा. *15*

(c) 'पैंजण'च्या आधारे लावणी वाङ्मयाची साधार वैशिष्ट्ये लिहा. *20*

Optional Province · optionalprovince.com

Q7. (a) 'प्रफुल्ल निसर्गाची आनंदगीते गाणारे बालकवि मनाची उदासीन स्थितिही तेवढ्याच प्रभावीपणे व्यक्त करतात.' सोदाहरण स्पष्ट करा. *15*

(b) 'मृद्‌गंध' मधील प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या कवितांचा परामर्श घ्या. *15*

(c) 'आजच्या समाजरचनेच्या अंतरंगाचे भेदक चित्रण करणारे कवि कुसुमाग्रज आशावादाचे स्फुल्लिंग चेतवणारे ही आहेत.' विशाखा'च्या आधारे स्पष्ट करा. *20*

Q8. (a) 'कवितेत मी माझ्याशीच संवाद करतो' या नारायण सुर्वे यांच्या विधानाच्या आधारे 'जाहीरनामा' मधील कवितांचे अंतरंग उलगडून दाखवा. *15*

(b) शब्दकला, प्रतिमा आणि रचनाबंध यांच्या आधारे 'संध्याकाळच्या कविता' मधील ग्रेस यांच्या कवितेचे सौंदर्य उलगडून दाखवा. *15*

(c) 'ढसाळ यांच्या कवितेतील विद्रोहाचा तीव्र स्वर' या 'सत्तेत जीव रमत नाही' या 'संग्रहात अधिक अंतर्मुख आणि अस्तित्त्वलक्ष्यी झालेला आहे.' विवेचन करा. *20*

Optional Province · optionalprovince.com